# —:प्रेसनोट:—

## पायधुनी पोलीस ठाणेने अंमली पदार्थाची खरेदी विक्री करणाऱ्या ०४ आरोपीकडुन ०१ किलो ४० ग्रॅम वजनाचा ''चरस'' किंमत ०४,००,०००/— रुपये असा अंमली पदार्थ जप्त करुन चार आरोपींना अटक केलेबाबत......

| | |
|---|---|
| पोलीस ठाणे | पायधुनी पोलीस ठाणे, मुंबई |
| एन.डी.पी.एस गु.र. क्रमांक व कलम | १२९/२०२३ कलम ८ (क), २० (क) सह २९ एन. डी. पी. एस. कायदा १९८५ |
| गुन्हा घडला दिनांक व वेळ | दिनांक ०४/११/२०२३ रोजी १३.३५ वाजताचे सुमारास. |
| गुन्हा दाखल दिनांक व वेळ | दिनांक ०४/१०/२०२३ रोजी १५.३० वाजता |
| जप्त मुद्द्देमालाचे वर्णन | १) **किंमत ०४,००,०००/— रूपये किंमतीचा ०१ किलो ४० ग्रॅम वजनाचा ''चरस'' हा अंमली पदार्थ**<br>२) सॅमसंग एम ३१ (जुना वापरता), कि. अं. ८,०००/— रूपये<br>३) रेड मी नोट ११ (जुना वापरता), कि. अं. ८,०००/— रूप्ये<br>**एकुण ०४,१६,०००/— ची मालमत्ता जप्त** |
| आरोपी अटक | १) आरफात इकबाल काझी वय २६ वर्षे<br>२) शाहरुख मोहम्मद अली तांबु वय २६ वर्षे<br>३) फैजलअली मोहम्मद अली मेमन वय २३ वर्षे<br>४) नाहीद अश्रफ मेमन वय २८ वर्षे |

यातील फिर्यादी यांना त्याच्या विश्वासू बातमीदाराकडून माहीती प्राप्त झाली की, 'चरस' या अंमली पदार्थाची विक्री करण्यासाठी दिनांक ०४/११/२०२३ रोजी १३:३५ वाजताचे सुमारास घोघारी मोहल्ला, पायधुनी मुंबई या ठिकाणी दोन इसम विक्री करण्यासाठी चरस हा अंमली पदार्थ घेवुन आले नमुद दोन्ही इमसमांना ताब्यात घेवुन त्यांच्याकडुन किंमत ०४,००,०००/— रूपये किंमतीचा ०१ किलो ४० ग्रॅम वजनाचा ''चरस'' हा अंमली पदार्थ पंचनाम्या दरम्यान जप्त करण्यात आला सदर इसमांनी चरस हा अंमली पदार्थ वाहतुक व विक्री करण्याच्या उद्द्देशाने स्वत:च्या कब्जात बेकायदेशीररीत्या बाळगला म्हणुन फिर्यादी यांनी सराकारतर्फे फिर्यादी दिल्याने पायधुनी पोलीस ठाणे येथे एन डी पी एस गु.र.क्र.१२९/२०२३ कलम ८ (क), २० (क) सह २९ एन. डी. पी. एस. कायदा १९८५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

नमुद गुन्हयाच्या तपासात कार्रवाई दरम्यान आरोपी नामे १) आरफात इकबाल काझी वय २६ वर्षे २) शाहरुख मोहम्मद अली तांबु वय २६ वर्षे यांना अटक करण्यात आली. सदर अटक आरोपींनी पंचनाम्या दरम्यान सांगितल्या प्रमाणे नमुद चरस हा अंमली पदार्थ त्यांनी इसम नामे आरोपी क्र ०३ फैजलअली मोहम्मद अली मेमन वय २३ वर्षे याच्या सांगण्यावरुन विक्रीसाठी आणला होता. त्याअनुशंगाने नमुद आरोपी फैजलअली मोहम्मद अली मेमन वय २३ वर्षे यास पनवेल, नवी मुंबई परीसरातुन ताब्यात घेवुन त्यास नमुद गुन्हयात अटक करण्यात आली आहे. तसेच सदर ''चरस'' हा अंमली पदार्थ नमुद तिन्ही आरोपींनी आरोपी क्रमांक ०४ नाहीद अश्रफ मेमन वय २८ वर्षे याच्या जवळुन आणला होता. सदर आरोपी नाहीद अश्रफ मेमन वय २८ वर्षे हा चिपळुण, जि रत्नागिरी येथे असल्याने नमुद आरोपीस अटक करण्यासाठी तपासकामी मा वरिष्ठांची लेखी परवानगी प्राप्त करुन सदर ठिकाणी जावुन त्यास ताब्यात घेण्यात आले व नमुद गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

अशाच प्रकारे ‘अंमली पदार्थमुक्त समाज’ बनविण्याचे दृष्टीने बृहन्मुंबई शहर पोलीस आयुक्तालय सतत प्रयत्नशील आहे.

सदरची यशस्वी कामगिरी मा.अप्पर पोलीस आयुक्त सो, डॉ.श्री.अभिनव देशमुख, दप्रावि., मा पोलीस उपायुक्त सो, डॉ.श्री.मोहीत गर्ग, परिमंडळ–०२, मा सपोआ श्रीमती जोत्स्ना रासम पायधुनी विभाग, प्र.वपोनि रविंद्र कुडपकर, प्र.पोनि(गुन्हे ), यांचे मार्गदर्शन व सुचना प्रमाणे सपोनि नितीन जाधव, पोउपनि संकल्प मोकल (गुन्हे प्रकटीकरण अधिकारी),पोहक्र ०५०३४८/इमरान मुल्ला, पोहक्र ०६०३७०/संदीप पाटील, पोहक्र ०६१४७७/धनराज पाटील, पोशिक्र ०९०६२९/रवि लोहारे, पोशिक्र १३०२८८/लिंबाजी इतापे या पथकाने पोलीस ठाणे एटीसी पथक पो.ह.क्र.३२५००/केशव राणे, पो. ह.क्र.३२६५५/हमीद आत्तार, पो.ह.क्र.०३२३१/संदीप कारभळ, पो.शि.क्र.०८०५१७/परेश साळुंखे यांच्यासह पार पाडली असुन नमुद गुन्हयाचा तपास पोउपनि संकल्प मोकल हे मा वरिष्ठांच्या मार्गदशनखाली व सुचनांप्रमाणे करीत आहे.